# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त रोखपाल/ लेखापाल/लेखाधिकारी यांची करार पध्दतीने तात्पुरती नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतचे: छायाचित्र येथे चिकटवावे. |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-…………………………………………………….

२) अर्जदाराचा पत्ता :-…………………………………………………….

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-…………………………………………………….

४) सेवानिवृत्तीचे वेतन :-……………………………………………………..

५) भ्रमणध्वनी क्रमांक :-……………………………………………………..

६) जन्म दिनांक व वय :-……………………………………………………..

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे कय? :- होय/नाही.

८) अनुभव :-……………………………………………………

९) https://mahabhumi.gov.in विभागाच्या संकेतस्थळावर दि. / /२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जहिरातीच्या अनुषंगाने सेवानिवृत्त रोखपाल/ लेखापाल/लेखाधिकारीया पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जहिरातीतील/ सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

१०) आवश्यक कागदपत्रे व सेवानिवृत्तीवेतन मंजूरीचा प्राधिकार पत्र(PPO) प्रत सोबत जोडली आहेत.

ठिकाण -:

दिनांक -: अर्जदाराची स्वाक्षरी

आवश्यक कागदपत्रे-

१) शिक्षण

२) सेवा निवृत्तीवेतन मंजूरीचा प्राधिकार पत्र

३) शासकीय सेवेचा तपशिल

| अ.क्र. | वर्ष | पदनाम | कार्यालयाचे नांवे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |

४) आधार कार्ड

५) पॅन कार्ड

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे
दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे – ४११ ००१.
✆ ०२०-२६१२६०७२ ✉- mahasvamitva@gmail.com Website- https://mahabhumi.gov.in

---

**सेवानिवृत्त लेखापाल/रोखपाल/लेखाधिकारी यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज मागविणेबाबत.**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३) मंत्रालय, मुंबई दिनांक १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार लेखाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त रोखपाल/ लेखापाल/लेखाधिकारीयांची करार पध्दतीने नियुक्ती १ वर्षाकरीता जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे येथे करण्याकरिता नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची तयार करण्यात येत आहे.

**सेवा निवृत्त रोखपाल/लेखापाल/लेखाधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने घेणेसाठीची सविस्तर कार्य व कर्तव्ये:-**

१. गावठाण जमाबंदी प्रकल्पाअंतर्गत गावनिहाय जमा होणाऱ्या सनद फी चा ताळमेळ ठेवणे.
२. या कार्यालयाकडून दिनांक २२/०४/२०२२ व २५/०४/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या Request for Proposal (RFP) अन्वये निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाला आहे किंवा कसे याची तपासणी करणे.
३. जिल्ह्यात विविध ठिकाणी राबविण्यात आलेल्या दरपत्रके/ई-निविदा टेंडरिंग-अथवा कोटेशन प्रकीयेच्या अनुषंगाने दिलेले कार्यादेश, झालेले काम व त्यानुसार खर्ची पडलेला निधी यामधील ताळमेळे घेणेकामी.
४. या कार्यालयाकडून अधिनस्त कार्यालयांना देण्यात येणाऱ्या निधी वाटपा बाबत लेखा जोखा ठेवणे.
५. अधिनस्त कार्यालयाकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे व प्राप्त झालेली उपयोगिता प्रमाणपत्र तपासणी करणे.
६. रोखीची नोंदवही अद्यावत ठेवणे.
७. अंतर्गत लेखा निरीक्षण, मा.महालेखाकार यांचेकडील निरीक्षण अहवाल यांचा ताळमेळ ठेवणे.
८. वित्त व लेखा विषयक विषयक सर्व कामकाज पहाणे

९. मा.जमाबंदी आयुक्त, मा.अपर जमाबंदी आयुक्त, उससंचालक भूमि अभिलेख नागरी भूमापन व कार्यालय अधीक्षक यांनी वेळोवेळी नेमूण दिलेली कामे करणे.

१०. केंद्रशासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे भूमि संसाधन विभागाने डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड्स मॉडर्नायझेशन प्रोग्राम (DILRMP) अंतर्गत भारतीय सर्वेक्षण संस्थेच्या मदतीने(तांत्रिक तज्ञ) राज्यातील शहरांमध्ये(स्थानिक स्वराज्य संस्था) नगर भूमापन भूमि अभिलेख तयार करण्यासाठी "National Geospatial Knowledge Based Land Survey of Urban Habitations" (NAKSHA) हा कार्यक्रम राबविला जात आहे. त्या अनुषंगाने नक्शा कार्यक्रमांअंतर्गत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था (ULB) यांचे कामाचे देयक अदा करणे व ताळमेळ घेणे.

**सेवा निवृत्त रोखपाल/लेखापाल/लेखाधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने घेणेसाठीच्या अटी व शर्ती-**

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) मंत्रालय, मुंबई दिनांक १०/०६/२०२५ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सर्वसमावेशक एकत्रित सुचना निर्गमित करण्यात आलेल्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

२. उमेदवार हा सेवानिवृत्त रोखपाल/लेखापाल/लेखाअधिकारी असावा.

३. उमेदवारास रोखपाल/लेखापाल /लेखाअधिकारी या पदावरील किमान ३ ५ वर्षाचा असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवारास संगणकाचे चांगले ज्ञान असावे.

६. उमेदवाराचे वय ६३ वर्षापेक्षा अधिक नसावं.

७. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा

८. उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील माहितीचे अवलोकन करुन mahanaksha@gmail.com या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून त्यांचे अर्ज १५ दिवसांच्या आत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ९९२२९९५३७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

९. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जाना उत्तर देण्यात येणार नाही.

१०. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख कार्यालयास अथवा त्याचे समितीस राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचा-यांस जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे दुसरा व तिसरा मजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प,पुणे येथे काम करावे लागेल व आवश्यकतेनुसार महाराष्ट्र राज्यात कामानिमित्त दौरा करणे आवश्यक राहील.

१२. निवड करण्यात आलेल्या अधिका-याची नामिकासूची तयार करून विवक्षित कामाची निकड विचारात घेऊन त्यांचेमधून आवश्यक कर्मचा-यांची सेवा घेण्यात येईल.

१३. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३) मंत्रालय, मुंबई दिनांक १०/०६/२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१४. उमेदवारांची अंतिम निवड झालेनंतर काही कारणास्तव काढून टाकण्याचे संपूर्ण अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख कार्यालयास अथवा त्याचे समितीस राहील.

जहिरातीचा नमुना

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे

दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे – ४११ ००१.

✆ ०२०-२६१२६०७२ ✉- mahasvamitva@gmail.com Website- https://mahabhumi.gov.in

---

**सेवानिवृत्त लेखापाल/रोखपाल/लेखाधिकारी यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज मागविणेबाबत.**

लेखाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त रोखपाल/ लेखापाल/लेखाधिकारीयांची करार पध्दतीने नियुक्ती १ वर्षाकरीता आवश्यकतेनुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे येथे करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३) मंत्रालय, मुंबई दिनांक १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

अधिक माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे यांचे संकेतस्थळ **https://mahabhumi.gov.in** वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती, अटी व शर्ती, कार्य-कर्तव्ये व अर्जाचे अवलोकन करून अर्ज सादर करावेत.

जहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवसांत अर्ज सादर करावा.

Digitally signed by
SUHAS KRISHNA DIWASE
Date: 13-01-2026
11:02:27

**( डॉ.सुहास दिवसे)** भा.प्र.से.

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**

**भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे**